**कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो 3 मार्गिका**

**मेट्रो 3 च्या ट्रेन्स साठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने एलस्टॉमसोबत केला करार.**

**मुंबई, १० सप्टेंबर / २०१८:** मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड (एमएमआरसी) ने कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मार्गिकेच्या अत्याधुनिक रोलिंग स्टॉकच्या खरेदीसाठी "ऑलस्टॉम ट्रान्सपोर्ट इंडिया लिमिटेड आणि एल्स्टॉम ट्रान्स्पोर्ट एस.ए फ्रान्स" यांसोबत करार करण्यात आला. संबंधित पूर्व-पात्र बोलीधारकांमध्ये सर्वोत्तम ठरल्याने, ALSTOM या कंपनीला १९ जुलै, २०१८ रोजी कार्यादेश देण्यात आला होता. या प्रक्रियेचा अंतिम टप्पा आता करारावर स्वाक्षऱ्या करून पूर्ण करण्यात आला.

ऍलस्टॉम ट्रान्सपोर्ट यांच्याद्वारे एकूण २४८ अत्याधुनिक मेट्रो डब्यांचा पुरवठा करण्यात येणार आहे. यामध्ये प्रत्येकी 8 डबे असलेल्या एकूण 31 गाड्यांचे अत्याधुनिक डिझाईन, उत्पादन, पुरवठा, स्थापित करणे आणि त्यासोबत, तपासणी आणि कमिशन करणे या कामाचा समावेश आहे. गाडीची रुंदी 3.2 मीटर असून लांबी 180 मीटर इतकी असेल. 2350 प्रवासी एका वेळी प्रवास करू शकतील अशी (प्रति चौरस मीटरमध्ये 6 प्रवासी) व्यवस्था असेल. हि ट्रेन 25 केव्ही एसी ट्रक्शन सप्लायवर चालवली जाणार आहे. ही ट्रेन स्टेनलेस स्टीलची असून प्रत्येक डब्यात 4 दरवाजे असतील.

यासंदर्भात वक्तव्य करताना एमएमआरसीचे प्रवक्ता म्हणाले, " मेट्रो डब्यांसंदर्भात झालेला हा करार हा या प्रकल्पातील महत्वाचा टप्पा असून मुंबईकरांच्या सुरक्षित, सुखकर व आरामदायी प्रवासाच्या दिशेने टाकलेले हे सुदृढ पाउल आहे"

अलस्टॉम इंडिया आणि दक्षिण आशियाचे व्यवस्थापकीय संचालक अलिन स्पॉहर यांनी सांगितले की,"आम्ही मुंबई मेट्रो रेल्वे 3 च्या या प्रकल्पाचे भागीदार आहोत याचा आनंद आहे. विश्वसनीय, प्रगत आणि स्पर्धात्मक वाहतूक उपाय उपलब्ध करुन देऊन आम्ही मुंबईकरांच्या वाहतूक समस्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील राहू, त्याचप्रमाणे 'मेक इन इंडीया'ला प्रोत्साहन करण्यासाठी आम्ही या ट्रेनचे ७५% उत्पादन हे भारतात करणार आहोत."